# घडते नवेच काही

(चंद्र आणि लज्जा यावरील कवितासंग्रह)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**घडते नवेच काही** (चंद्र आणि लज्जा यावरील कवितासंग्रह)
**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.
**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995633-6-0
**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन
**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

'घडते नवेच काही' या काव्यसंग्रहाचे लेखन माझ्यासाठी अत्यंत आत्मिक, भावनांनी ओथंबलेले आणि नाजूक क्षणांनी गुंफलेले होते. या कवितांचा जन्म अचानक नाही; तो एक शांत, दीर्घ, अंतर्मुख प्रवास आहे. जीवनात काही क्षण असे येतात जेव्हा आपण स्वतःशी अचानक भेटतो. आपल्या मनात दडलेल्या प्रकाशाशी, सावलीशी, संकोचाशी आणि उमेदशी. ते क्षण मनात थरथरणाऱ्या चंद्रकिरणांसारखे असतात. त्याच क्षणांतून या कविता हळूहळू, नकळत उमलल्या.

चंद्र आणि लज्जा हे या संग्रहातील मुख्य विषय. पण ते माझ्यासाठी केवळ प्रतीक नव्हते; ते माझ्या स्वतःच्या अस्तित्वाचा एक भाग बनले होते. जेव्हा जेव्हा मी रात्रीच्या आकाशाकडे पाहिले, तेव्हा मला माझ्या मनातील शांतता, प्रश्न, आणि कोमलता चंद्राच्या रुपड्यात दिसली. कितीही काळोख असो, चंद्र कुठेतरी असतोच. अर्धा, चतुर्थांश, किंवा कधीकधी फक्त एक हलकी रेघ. तसेच आपल्या मनातही काहीतरी उजेड शिल्लक असतोच. हे जाणवल्यावर अनेक कवितांची सुरुवात झाली. लज्जा हा दुसरा अनुभव आणि तो मात्र अत्यंत वैयक्तिक. अनेकदा आपण स्वतःच्या भावनांना नावही देऊ शकत नाही. संकोच, ओढ, भीती, आनंद, आश्चर्य हे सर्व मिळून एक नाजूकसा रंग तयार होतो. त्या रंगाला मी 'लज्जा' म्हटले. या लज्जेत लपलेली सौम्यता माझ्या लेखणीतून सतत झिरपत राहिली. काहीवेळा मला वाटले, ही लज्जा म्हणजे माझ्या स्वतःच्या मनाचे आरसे आहेत ज्यात मला माझी खरी, कोवळी, नाजूक बाजू दिसते.

या संग्रहातील अनेक कविता मला स्वतःलाच अनपेक्षितपणे मिळाल्या. कधी चंद्रप्रकाशात बसताना, कधी एखाद्या शांत क्षणात, तर कधी अचानक भावनिक ओल डोळ्यांत दाटून आली तेव्हा. काही कविता मला धीर देत आल्या, काही कवितांनी मला प्रश्न विचारले, तर काहींनी मला माझ्या चाललेल्या रस्त्याकडे नव्याने पाहायला लावले. शब्द लिहिताना कधी मला वाटले की मी लिहित नाही; उलट शब्दच माझ्यातून उमटत आहेत. विशेषतः चंद्रांवरील कविता लिहिताना एक अजब शांतता माझ्या मनाभोवती घुटमळत असे. जणू रात्रीची हवा स्वतः कवितेची

ओळ होण्यासाठी हलके फुसफुसत आहे. त्या क्षणी मी फक्त एक माध्यम होते. चंद्र बोलत होता, भावना वाहत होत्या, आणि कविता स्वतः आकार घेत होती.

लज्जेवर आधारित कविता मात्र वेगळीच होती. त्या लिहिताना माझ्या मनातील कोवळ्या भावनांचे दरवाजे स्वतः उघडत गेले. काही आठवणी, काही स्वप्ने, काही गुपित भीती सगळे या कवितांच्या शाईत मिसळले. कधी लज्जा फुलासारखी उमलली, कधी धुक्यासारखी विरघळली, आणि कधी हृदयाच्या शांत कोपऱ्यात बसून एका स्मितासारखी हलकींशी भासली.

हा काव्यसंग्रह पूर्ण करताना मला जाणवले की 'घडते नवेच काही' ही फक्त कविता संग्रहाची ओळ नाही; ती माझ्या जीवनातील बदलांची, उमलण्यांची, आणि शांत परिपक्वतेची खूण आहे. पूर्वी मी बदलांना भीतीने पाहत असे. पण चंद्राकडून मी शिकले. बदल हीच शाश्वतता आणि लज्जेकडून शिकले. प्रत्येक बदलाला एक नाजूक भावनिक स्पर्श असणारच. लेखनप्रक्रियेदरम्यान असा अनेकदा क्षण आला जेव्हा मला स्वतःलाच जाणवले की मी अधिक संवेदनशील, अधिक शांत, अधिक जाणिवपूर्वक होत चालले आहे. कवितांच्या ओळींमध्ये जणू माझ्याच मनाचे आकार उमटत होते. काही कविता संपवल्यावर मला डोळ्यांत नकळत पाणी आले. कारण त्या माझ्या स्वतःच्या सत्याच्या खूप जवळ होत्या. या संग्रहाने मला स्वतःकडे नव्याने पाहायला शिकवले. माझ्या मनातले प्रकाशकिरणही शोधायला शिकवले, आणि सावल्यांशी गोड मैत्री करायला देखील. लज्जेची कोमलता मला सांगत राहिली. स्वतःला ओळखणे म्हणजे कमजोरी नव्हे; तेच खरी ताकद आहे. या प्रवासात माझ्या मनात एकच इच्छा रुजली. वाचकांनाही या कवितांतून त्यांचे स्वतःचे चांदणे सापडावे. त्यांच्या मनातल्या लज्जेचे कोवळे रंग तेही पाहावेत. बदल, अनिश्चितता, भावनिक धुकं या सगळ्यांना स्वीकारताना या कवितांची साथ त्यांना मिळो.

'घडते नवेच काही' हा काव्यसंग्रह पूर्ण करताना मला माझ्या लेखनाचे, माझ्या मनाचे आणि माझ्या अस्तित्वाचे एक नवीन रूप मिळाले. या कविता वाचकांपर्यंत पोचताना हा प्रवास अधिक सुंदर, अधिक अर्थपूर्ण होईल. हीच नम्र आशा.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

'घडते नवेच काही' हे शीर्षक जसे उच्चारले, तसेच मनात एक हलकीशी लहर उमटते. प्रत्येक क्षणात, प्रत्येक श्वासात, प्रत्येक भावनेत काहीतरी सतत बदलत असते; जीवनाची हीच तर अखंड चक्राकार धडधड. या बदलाच्या प्रवाहात चंद्रासारखी शांतता आणि लज्जेसारखी कोमल भावना एकत्र मिसळली, की निर्माण होतो तो एक अद्वितीय काव्यविश्व जिथे प्रकाशही नाजूक असतो, आणि सावलीही अर्थपूर्ण. हा काव्यसंग्रह त्या दोन्ही भावनांचा सुंदर संगम आहे. चंद्राच्या शीतलतेतून वाहणारी निर्मलता आणि लज्जेच्या गुलाबी संकोचातून उमटणारी आत्मजाणीव या दोन्हींच्या स्पर्शातून कवीने जीवनाला एका सुस्काऱ्याच्या, स्मिताच्या आणि निःशब्द स्वीकृतीच्या भावनेत पाहिले आहे.

चंद्र हा कवींचा आवडता प्रतिमा-बंध. पण या संग्रहात चंद्र फक्त आकाशातील गोळा नाही; तो सौंदर्य, स्थैर्य, बदल, स्वप्न, अपूर्णता आणि आशेचा एक विराट प्रतीक आहे. कधी तो डोक्यावर तरंगणारा नीलमणी वाटतो, तर कधी क्षितिजावर लाजत टेकणारी शांत उजळटी. चंद्र कधी प्रेमाचा साक्षीदार, कधी एकाकीपणाचा साथी, तर कधी आत्म्याच्या खोल गूढतेचा आरसा बनतो. कवीने चंद्राच्या प्रत्येक टप्प्यातून भावनांच्या वेगवेगळ्या छटा उलगडल्या कधी वाढत्या चांदण्यातील उमेद, कधी कमी होत जाणाऱ्या चंद्रातील ओढ, आणि पौर्णिमेच्या प्रकाशातील आत्मप्रसन्नता.

लज्जा ही दुसरी मध्यवर्ती अनुभूती पण ती इथे भीतीची नाही, दडपणाची नाही. हे लज्जेचं चित्रण म्हणजे नाजूकतेचा, सूक्ष्मतेचा आणि अंतर्गत पवित्रतेचा गौरव. कवी लज्जेला गुलाबी फुलपाखरू म्हणतो, जे फडफडत जरी असले तरी त्याच्या स्पर्शात एक अद्भुत मोहकता असते. लज्जा म्हणजे स्वतःच्या सौंदर्याची,

भानाची, आणि अस्तित्वाच्या नाजूकतेची जाणीव. ती कधी एखाद्या नव्या उमलणाऱ्या भावनेचा संकोच असते, तर कधी मनातल्या बदलाची पहाट. या दोन भिन्न, पण परस्परपूरक भावनांचा संगम 'घडते नवेच काही'मध्ये एक काव्यात्मक विश्व निर्माण करतो. चंद्र जिथे सौंदर्याचा स्थिर प्रकाश आहे, तिथे लज्जा त्याच प्रकाशाला कोमल स्वर देणारी रेशमी झुळूक आहे. चंद्राच्या काव्यांत नीरवता आहे, तर लज्जेच्या ओळींत हलके कुजबुजते न कळणारे काही. या संग्रहात दोन्ही एकत्र येऊन जीवनाचा सूक्ष्म तत्त्वज्ञान मांडतात. न सांगता सांगणारे, न भिडता भिडणारे.

कवी या दोन प्रतीकांमधून जीवनातील बदलाचा, उमलण्याचा, आणि स्वतःच्या शोधाचा प्रवास सुंदरपणे उलगडतात. चंद्राच्या कलांप्रमाणे जीवनही कधी पूर्ण, कधी अपूर्ण, कधी अंधारमय, तर कधी प्रकाशमान पण प्रत्येक टप्पा आवश्यक, प्रत्येक अवस्था अर्थपूर्ण. लज्जा म्हणजे त्या बदलांना जाणवण्याची नाजूक भावना. नवीन घडणाऱ्या क्षणांचा पहिला स्पर्श, पहिली जाणीव, पहिली थरथर.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या कवितांमध्ये या दोन्हींची लय वेगळी आहे. चंद्राची लय दीर्घ, शांत, संयत. लज्जेची लय छोटी, कोवळी, हलकीशी थरथरणारी. पण दोघे मिळून जेव्हा एकत्र येतात, तेव्हा तयार होते जीवनाची सर्वात सुंदर स्वरमाला. या संग्रहातील प्रत्येक कविता ही त्या स्वरांची स्पंदने घेऊन पुढे सरकत राहते.

या कवितांमध्ये चंद्र अनेकदा प्रेमाचे रूप घेतो. चांदण्याची शीतलता म्हणजे सोबत असणाऱ्या व्यक्तीची गूढ ऊब; पौर्णिमेचा उजेड म्हणजे आत्मविश्वासाचे तेज; आणि कृष्णपक्षातील रात्री म्हणजे मनातल्या भीती, शंका, आणि आत्मसंघर्षाचे सावट. कवीने या रात्रींना तितक्याच प्रेमाने हात घातला आहे. त्यांना अंधारासारखी भीती नाही; उलट तो अंधारच कवीच्या शब्दांना एक खोल जाण देतो.

लज्जा येथे स्त्रीच्या बंधनांतून नाही, तर तिच्या अंतर्मनातून येते. करुणा, गोडवा, कोमलता, सौंदर्य आणि स्वतःशी असलेली आत्मिक बैठक हे सर्व लज्जेच्या कवितांत झिरपतं. ती कधी प्रियकराला पाहून उमटते, कधी स्वतःच्या

प्रतिबिंबात स्वतःलाच पाहताना, तर कधी स्वप्नातल्या सत्याला प्रत्यक्ष आयुष्यात जाग येताना.

कधी चंद्र आणि लज्जा दोघेही एकाच कवितेत मिसळतात. चंद्र वरती चमकत असतो आणि खाली मनात संकोचाची फुलं उमलत असतात. या संयोगात एक अप्रतिम कोमलता निर्माण होते. जणू रात्रीच्या आकाशात एक हलकीशी गुलाबी रेषा पसरली आहे, ज्यात सृष्टीचा श्वासच वेगळा जाणवतो.

कवयित्रीच्या लेखणीतून उलगडणारी भावविश्वं अनेक थरांनी व्यापलेली आहेत. प्रेमाची अबोल गोडी, एकटेपणाची जड ओढ, सौंदर्याची शीत स्पर्शरेषा, भीतीचे सूक्ष्म सावट, आत्मशोधाचा प्रकाश. कवितांमध्ये जीवनाची गुंतागुंत दिसते, पण त्याच वेळी एक सुखद प्रवाहही जाणवतो.

'घडते नवेच काही' ही ओळ कवीसाठी फक्त एक विधान नाही; ती जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे सार आहे. चंद्र बदलतो, लज्जा बदलते, आणि आपले जीवनही त्याच बदललेल्या क्षणांतून नवी जाणीव घेऊन पुढे सरकत राहते. या संग्रहातील कविताही तशाच आहेत. प्रत्येक कविता एक नवीन अर्थ घेऊन उगवते आणि वाचकाच्या मनात एक नवीन प्रकाश पेटवून जाते.

या प्रस्तावनेतून या संग्रहाचा आत्मा थोडा उलगडला असला तरी वास्तविक सौंदर्य त्या कवितांच्या ओघात आहे. जिथे चांदण्याची थंड मिठी आणि लज्जेची कोवळी कुजबुज मनावर मऊ शहारे उठवतात. 'घडते नवेच काही' हा काव्यसंग्रह चंद्राच्या उजेडाने आणि लज्जेच्या नाजूक रंगांनी सजलेला मनाला हलके हलके स्पर्शून जाणारा एक भावप्रवास आहे.

**मधुरा वेलणकर**

# अनुक्रमणिका


१) सुगंध दरवळ श्वासाचा ... १३
२) सुखाचे चांदणे पडता ... १४
३) चंद्रम्या तू सांग ना ... १५
४) गाव राजसाचे दूर ... १६
५) कधी ही रात पुनवेची ... १७
६) पुनव मनात विराळी ... १८
७) चांदण्यांची ओंजळ ... १९
८) कृष्णमय हो राधिका ... २०
९) अनुबंध मग तिथले ... २१
१०) आठव येते पाठव त्याला ... २२
११) भरात कोजागरती ... २३
१२) शरद पौर्णिमा अलंकार जणू ... २४
१३) कोजागिरी संपलीच नाही न ... २५
१४) जा उडा फुलपाखरांनो ... २६
१५) आधार चांदण्यांचा ... २७
१६) तो चंद्रमा खुशीत ... २८
१७) प्रभातवेळी किरणशलाका ... २९
१८) तू सोबती असताना ... ३०
१९) माझे सुखाचे चांदणे होशील ... ३१
२०) हातात मोगऱ्याच्या ... ३२
२१) निसर्ग वारा पाऊस पाणी ... ३३
२२) माझा चांदवा तू सदा ... ३४
२३) असो मोकळे श्वास आकाश तारे ... ३५
२४) नवीन वाटे चंद्रमा ... ३६
२५) चंद्र खिडकीशी आला ... ३७
२६) चतुर्दशीला पूनव ... ३८
२७) चांद उतू किती गेला ... ३९
२८) कंदील हाती शोधत होते ... ४०
२९) त्याच्यासाठी हृदयपाकळी ... ४१
३०) शापित शशीचे चक्र उदास ... ४२
३१) तुझं माझं आभाळ ... ४३
३२) स्वप्नांची फुलपाखरे येती ... ४४
३३) सुखाचा किनारा ... ४५
३४) गुलाब उपवन गुलाबी मळे ... ४६
३५) भाग्यवती मज हातीची ... ४७
३६) हात तुझा रे धरून जाईल ... ४८
३७) हे असंच होतं नेहमी ... ४९
३८) पहा दिव्यांचे रिंगण ... ५०
३९) मोहरीच्या पिवळ्या पिवळ्या फुलात ... ५१
४०) सारी मजा असावी... ... ५२
४१) कोठून जाग आली ... ५३
४२) म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग ... ५४

४३) चुडा जपला मनी मी ... ५५
४४) पाऊस म्हणजे काय ... ५६
४५) भीज पावसाची ... ५७
४६) पाऊस वेडा वागे ... ५८
४७) एक गुलाब जो ... ५९
४८) वर्षाराणीचे चित्र मोहक ... ६०
४९) पापणी कोरली येथे ... ६१
५०) प्रिया वधू मी
सख्या तुझी रे ... ६२
५१) तुझे हळवेसे माझे होणे ... ६३
५२) प्रियवरा वळून
पाहतो का ... ६४
५३) शोनुली गोडुली बाहुली ... ६५
५४) प्रिये अनुप्रिये ... ६६



## (१)
## सुगंध दरवळ श्वासाचा

जलधारांच्या अमृतथेंबातुन
ओघळून ये राणी
स्पर्श गारवे मना हवे जे
कोमलांगी तू दे राणी

आज मला जे पुन्हा खुणावे
मीलन मधुतम होताना
गतजन्मीच्या पुण्याईने
फळास ऐसे येताना

शब्द तुझा जो माधुर्याचा
मधुकण भरती तुझ्या मनी
भाव गोडवा झळकत राही
नजरेतून तव प्रीतकणी

का लज्जेचा पडदा धरीशी
अंग चोरीशी मिठीतुनी
मिटल्या लोचनी स्वप्न रंगविशी
धीर धरावा किती कुणी

ओलेत्या अंगास शहारा
सुगंध दरवळ श्वासाचा
देती पापण्या खडा पहारा
सत्य क्षण की भासाचा

बरस बरसू दे वर्षावातून
मेघ दाटल्या हृदयासी
बाहुंमध्ये ऋतू सांभाळीन
अधरामृत दे सदयासी

दि.२८/०६/२०२४
सकाळी ०७.३४ वा.



## (२)
## सुखाचे चांदणे पडता

सुखाचे चांदणे पडता
मनाला येते का भरती
फळावी आस आसुसली
चकोराची जशी रीती


कळावे त्याचसाठी ही
प्रतीक्षा जन्मोजन्माची
नसावे दुःख का वाटे
जगाया जळमटे त्याची

अमावस दूर सारूनी
कलेने वाढणे होते
ऱ्हासाच्या राती पचवाव्या
पुनव मग अलगदशी येते

दुःख हे ना ठरते कधीही
सुखाचे क्षणही ना उरती
हवे जे वाटते मनुजा
जपाया दो क्षणही पुरती

सुखाचे चांदणे यावे
कुट्ट अंधार असताना
सुखे ही आपसूक पावावी
मनी ध्यानीही नसताना

दि.१५/०५/२०२४
सायंकाळी ०७.१७ वा.



## (३)
## चंद्रम्या तू सांग ना

कोणत्या गावात येशील
चंद्रम्या तू सांग ना
ही उदासी दूर ना रे
चांदण्यासह पांग ना

रोज रातीला असा मी
का झुरावे ना कळे
कोण जी आहे मनातच
जात नाही ना कळे

रोज मी ठरवून देतो
विसरुनी जाईन तिला
खोलवर ती रुजली आहे
सांग कसे सांगू तिला

वाटले होते कधी तू
बोलशील मज भावना
मांडशील आल्हाद देऊन
तिजपुढे माझ्या मना

पण तू वेड्या जाळीशी
माझ्याच नाजूक काळजा
दूरदेशी घेऊनी जा
हृदय मग तू जाळ जा

ती इथे अन तूही येथे
एकटा मी तळमळे
विरह दाहाची तुला मग
सांग दाहकता कळे

पाहता तुज तीच वाटे
का मला ती भेटते
त्या तुझ्या मग चांदण्याने
आग देही लपेटते

म्हणून म्हणतो सांग बाबा
आज तू कोठे कधी
गाव ते सोडून जाईन
असशी तू ती बघ आधी

दि.०५/०५/२०२४
दुपारी १२.४२ वा.



## (४)
## गाव राजसाचे दूर

जीवा जाळे हुरहूर
तिन्ही सांजेला का पूर
गाव चांदव्याचे आणि
राजसाचे दूर दूर

वरवर वाटते ना
किती शीतल चांदणे
कसे जाळते मनाला
नये शब्दात सांगणे

दिस सारा सरकतो
सांज काहूर मांडते
काही प्रहरात युगे
सांज टांगणी टांगते

आकाशात चालताना
घाव बेमालूम देतो
नसे साजूक चांद हा
प्राण हलकेच घेतो

वर रातची विराणी
न संपते कधीच
जीव कासावीस होतो
आठवांनी रे आधीच

कळते ना घालमेल
काळजात जी चालते
आजकाल मी चांदणे
राजा प्यायचे टाळते

दि.२९/०२/२०२४
रात्री ०८.०९ वा.



## (५)
## कधी ही रात पुनवेची

गुलाबी चांदव्याची
रात आली नभी ही
जणू दारात माझ्या
सखी माझी उभी ही

तिच्या भाळी टिळा आहे
चमकता चांदवा गोल
तिच्या हास्यात मज लाभे
अजबसे सौख्य अनमोल

तिने ल्याली जरा काळी
निशा नावाची जी साडी
आणि वर चांदण्यांची ही
जडवली लुकलुकती खडी

तिच्या केसात सुमनांचा
सुगंधी मोगरी गजरा
मी हरखून जातो का ऐसा
प्रिये तू थांब ग जरा

तिच्या नजरेत रती हासे
तिच्या ओठात मधु भासे
तिला मी पाहतो नुसता
तिचे ते दिसणे हो खासे

असे वाटे न संपावी
कधी ही रात पुनवेची
मला लाभो प्रिया माझी
क्षणाला नित्य नवेची

दि.२२/०२/२०२४
रात्री १०.०० वा.



## (६)
## पुनव मनात विराळी

जळात पडल्या चांदोबाच्या
चांदण्याचे कौतुक
जळ ही होते चांदीसारखे
संगत शीतल आपसुक


चंचल चंचल लहरींवरती
लाट सुखाची येते
चांदण्यातल्या अलगदतेवर
हलके घेऊन जाते

ती झाडाची पहा डहाळी
कशास वाकून गेली
चांदण्यातली रात तिचीही
चांदणे माखून गेली

चंद्र कितीही करो कोंडाळे
चांदणे झिरपून जाते
खूण एक रात्रीस नभातून
हलके उतरुनी येते

तोच चंद्र अन्? तीच रागिणी
रोज कांती निराळी
मनास उधळून लावत जाते
पुनव मनात विराळी

दि.१८/०८/२०२४
सायं. ०६.१६ वा.



## (७)
## चांदण्यांची ओंजळ

उधळून चांदण्यांची
ओंजळ रीती करावी
हृदयात आकाशाची
व्यापकता की भरावी

येतील मेघ दाटुनी
बरसून जाती वा न वा
नुसत्याच फोल गर्जना
पाण्याची चाले वानवा

असले जरी तसेही
सांभाळुनी तयांना
जाते गगन पुढे ते
अदृश्य पायऱ्यांना

येईल चंद्र वेडा
वेडात भारलेला
तेजास वाढवीता
कधी तेज हारलेला

उगवे उषा पहाटे
सांजेस का निशाही
ऐसी नभास चढते
मोहकशी का नशा ही

त्याची तशी ती रूपसी
बदलून रंग येते
आभाळही भरूनी
प्रीतीत दंग होते

दि.२०/०८/२०२४
सकाळी ०९.५३ वा.



## (८)
## कृष्णमय हो राधिका

रूप तुझे श्रीरंगा कैसे
राधेच्या हृदयातुन जैसे
अंग श्यामल सावळ्याचे
संग नीलकमल तैसे

चंद्र खुलतो रासलीले
चांदण्यातुन दंग तू
राधेच्या हृदयात वसशी
मधुर मंजु छंद तू

एकरूप नि एकजीव
मिसळुनी जातो प्रिया
एकरस होताच दंग
राधेश्याम एकचि क्रिया

वसन सारखे ताल सारखे
सूर गवसून बोलती
राधेश्यामा संगतीने
प्रीत युगुले तोलती

रंगलेल्या सांजकाळी
दंगलेल्या गोपिका
गोपही धरतात फेर नि
कृष्णमय हो राधिका

दि.२५/०८/२०२४
सकाळी ०७.२१ वा.



## (९)
## अनुबंध मग तिथले

उसळून येती सागरात किती
लहरी अपरंपार
चंद्र पाहता चांदण्यासही
मोल चढे चंदार

फेन फेसळे लहरीसंगे
उधाणलेली रात
तशात वाटे हवी हवीशी
प्रिया तुझी रे साथ

कधी कुणाशी नाते जडते
की जुळते ऋणगाठ
सागर असला कितीही उतावीळ
संयमी तितुका काठ

पुनव रातीच्या अवखळ खोड्या
अवखळ लाटा उनाड
कितीही उठती पुन्हा त्या विरती
लहरी भाव पल्याड

असे चालती युगायुगातून
खेळ आगळे इथले
पैलतीरावर सापडतील बघ
अनुबंध मग तिथले

दि.३०/०८/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



(१०)

## आठव येते पाठव त्याला

उधाणलेल्या हृदयतरुवर
कलिका उमलून येती
पल्लव नसली तरीही ऋतू हे
धुंद झुलून जाती

आत असावी एक प्रेरणा
कुण्या चंद्राननेची
चरणतळाला सागर यावा
लहर उठो कामनेची

आकाशातील खुलून आल्या
ऐक चांदव्या राजा
आठव येते पाठव त्याला
दूर जो साजन माझा

येईल जवळी खुले ही कळी
लाज उमटून यावी
चांदण्यातल्या रातीमध्ये
मी त्याची होऊन जावी

गालावरती मदनलेख तो
लिहून जवळी घेईल
खुशीत तेंव्हा सुमनपाकळी
बहरुन कवळी येईल

दि.२१/०९/२०२४
सकाळी ०७.५८ वा.



## (११)
## भरात कोजागरती

कोजागिरीच्या चांदण्यातल्या
आपुल्या चांदण वेळा
लुकलूक भरल्या किती चांदण्या
आकाशातून मेळा

चंद्र हासतो खुदखुद गाली
प्रकाश पसरून गेला
कुणीतरी मज प्रिया मुखाचा
चंद्र ढगाआड  केला

झरझर झरल्या चांदण धारा
मेघांच्या पडद्यातून
नभात आले मेघ पांढरे
खुशीत लहरत आतून

आज कलांनी साऱ्या देखणा
असा चांदवा गोड
तुझी नि माझी दृष्ट न लागो
अशी देखणी जोड

वर्षभरातून येई एकदा
भरात कोजागरती
जीव जडविला सखे साजनी
जीवापाड तुजवरती

दि.१६/१०/२०२४
रात्री ११.३३ वा.



## (१२)
## शरद पौर्णिमा अलंकार जणू

शारद पुनव ही नवान्न पोर्णिमा
म्हणुनी गणली जाते
कृषीवलांच्या घरी संपदा
धान्यलक्ष्मी ही रहाते

अश्विन मासी नवरात्रीच्या
शुभे पाऊले येते
विजयादशमी देऊन विजया
बळा वाढवून देते

नवीन आले धान्य जे घरा
कणग्यांमधुनी चला हो भरा
वर्षभराच्या अन्नासाठी
शेतामध्ये कष्ट की करा

नवान्न अश्विन पोर्णिमेस हे
नैवेद्या दावूनी
सुरू करायचे आता पहायचे
पदार्थ ते खाऊनी

नव्या तांदुळाची खीर करुनी
कोजागिरीच्या राती
जे धान्य आले घेऊन हाती
लक्ष्मी मातेसाठी

असा सोहळा भारतीय हा
अन्न परंपरेचा
शरद पौर्णिमा अलंकार जणू
प्रियतम युगंधरेचा

दि.१७/१०/२०२४
सकाळी ०६.५३ वा.




## (१३)
## कोजागिरी संपलीच नाही न

अजून तुझ्या मनातली
कोजागिरी संपलीच नाही न
रेंगाळत बसला आहेस
क्षण चंद्रम्या मनात तुझ्या काही न

सारी वसुधाच तुझ्या कौतुकानं
चांदण्यात न्हाली होती
प्रियकराची प्रियतमाही
धुंद चांदणी झाली होती

बहाणे कितीतरी शोधले लोकांनी
तुझ्यासवे बसण्याचे
गप्पा गोष्टी करत करत
मुक्त जरा हसण्याचे

कुणी आळवले सुरेल गाणे
कुणी आठवणी काही
कुणी जुन्या काळात मदभऱ्या
निज काळजा पाही

प्रत्येकाची को जागर्ति
किती स्फूर्ती ची झाली
तुला चांदव्या सांग कुणाची
खरंच आठवण आली

आजही तू तिथेच आणि
तसाच तेजाळलेला
सागर देखील प्रिया सुखास्तव
उधाण फेसाळलेला

दि.१८/१०/२०२४
सकाळी ०६.४३ वा.



## (१४)
## जा उडा फुलपाखरांनो

जा उडा फुलपाखरांनो
जगण्या ना बांधो कुणी
जे श्वास तुम्हा लाभले
अलवार मग सांधो कुणी

उगवतो तो सांजसमयी
चंद्रमा आल्हाद दे
त्या नभातून जी उडे ती
माळ खग प्रल्हाद दे

रंग असतील नानाविध
अंगावरी आकाशीही
तेवढे उल्हास ठेवा
रात्र तम वा प्रकाशीही

पारदर्शी साचेबंद
बरणी कोणी ठेविली
जीवन हे मग नाम दिधले
बंदी तेथे राहिली

सोड त्या बंधास आणिक
मोकळे तू श्वास घे
तूच वेड्या तुज जीवाला
वेगळाले ध्यास दे

दि.०६/१२/२०२४
रात्री १०.१२ वा.



## (१५)
## आधार चांदण्यांचा

अंधार रात्रीला का
आधार चांदण्यांचा
लुकलूक दिवे ते दूर
का तेज मागण्याचा

कोणीतरी असावे
अगदी जरीही दूर
दाटून मायेचा ये
त्याच्या उरात पूर

आहे कुणीतरी हो
आपुले जगात कोठे
देऊन साथ जाती
ऐसे विचार मोठे

का असतो समय नेहमी
आपुला सदा समान
उत्कर्ष होत जातो
कधी खोल गर्त जाण

पडत्या विपत्ती समयी
वाटे जीवा दिलासा
तो आपला जवळचा
नको कोणता खुलासा

दि.०८/१२/२०२४
रात्री १०.५३ वा.



## (१६)
## तो चंद्रमा खुशीत

तो चंद्र का झुरावा
वेडा नभात सांगा
कोणीतरी तयाला
सखी काळजास बांधा

मोजू दे ठोके तेथे
आहे का नाव त्याचे
चुकला कधी जरी तो
कळणार त्यास त्याचे

राहू दे थोडे तेथे
गावी मनाच्या त्याला
सखी अंतरात शशी का
इतका प्रसन्न झाला

डोकावताच तेथे
वेगात स्पंदनेही
झाली सखी मनाची
जुळली पुन्हा मनेही

आता न झुरतो कधीही
जातो तिच्या कुशीत
असतो म्हणून आता
तो चंद्रमा खुशीत

दि.१३/०१/२०२५
रात्री १०.०२ वा.




## (१७)
## प्रभातवेळी किरणशलाका

प्रभातवेळी किरणशलाका
येतील बघ भूवरी
स्वर्ग सापडे तेजामधुनी
हर्षित हो शर्वरी


झाडावेलींच्या गाळणीतून
गाळून येतो रवी
नव्याच ढंगामध्ये उजळते
अंधारी ही अटवी

हास्य उमटले जणू इंद्राचे
की चांदणे चंद्राचे
जरा उजेडी वातावरणी
गगनी रंग मंद्राचे

निळसर सुंदर छटा पसरती
मन निळसर जणु श्याम
रोज सकाळी येशील सखया
होऊन तू अभिराम

एक प्रेरणा एक चेतना
कुणी पाठवली पहा
सौंदर्याची परिभाषा ही
लोभसवाणी अहा

दि.१५/०२/२०२५
सकाळी ०७.४२ वा.



## (१८)
## तू सोबती असताना

तू सोबती असताना
चांदणे उन्हाचे होते
गीत एक आपोआप
सारंगी मनाची गाते

तू सोबती असताना
सागरा भरती येते
आकाशाची नदी मग
ओथंबू वाहू पाहते

तू सोबती असताना
मोगऱ्याचा गंध फळे
भर उन्हाळ्यात सखी
सौख्य काय मज कळे

तू सोबती असताना
गुलमोहराची वाट
प्रीत झरे कलश हा
काळजाचा काठोकाठ

तू सोबती असताना
धुंद धुंद धुंदी एक
तू अशी ये जीवनात
गडदशी भाग्य रेख

दि.२३/०३/२०२५
रात्री १०.४९ वा.



## (१९)
## माझे सुखाचे चांदणे होशील

वाटलं मला आता तू
माझे सुखाचे चांदणे होशील
किती अंधाऱ्या राती नंतर
आल्हादाची गाणी गाशील

दैवदत्त अमावस्येच्या
खाईत गर्द दुःखाच्या
आयुष्य मज होरपळले रे
वाटा दावशील सुखाच्या

देईन तुला ऊन साहून
आजही सावलीच दाट
भावसरिता ओथंबलेली
आसुसलेला तिचा काठ

कुठेतरी मनामध्ये
पौर्णिमा उजळली आहे
चांदण्याच्या वाटेवरती
स्वप्नवेली फळली आहे

तुला कळेल का कोणास ठाऊक
चांदण्याचा चंद्र होणं
दुःख माझे दूर नेता
ग्रीष्म दाह मंद्र होणं

दि.१८/०४/२०२५
सकाळी ०७.११ वा.



## (२०)
## हातात मोगऱ्याच्या

हातात मोगऱ्याच्या
कलिकांनो या फुलूनी
माझ्या मनातल्या
मग येतील कळ्या उमलुनी

आवाज चांदण्यांचे
गंधात माखलेले
स्वप्नात जागे झाले
मज स्वप्न राखलेले

आता प्रिया तुझ्या रे
स्मृती आठवात येती
माझ्या मनास तेव्हा
गावात तुझ्या नेती

वाऱ्यासवे इथे मग
हिंदोळतात आशा
समजे तुला का सखया
ही मोगरीची भाषा

असते कधी मी
जेव्हा एकांत बैसलेली
ही मोगरी मनातून
सुरभीस पैसलेली

दि.२२/०४/२०२५
सकाळी ०६.२१ वा.



## (२१)
## निसर्ग वारा पाऊस पाणी

निसर्ग वारा पाऊस पाणी
बहरून येते सुंदर धरणी
कुठे जळांचे दर्पण नितळसे
कुठे ईश्वरी रम्य ही करणी

रंग फुलांचे कुणी सांडले
किती मांडले नित आकार
एक एक बघ पर्ण होतसे
सौंदर्याने मग साकार

हसता वेली फुले नाचती
आणि फळांच्या जाती लगडती
कुठे निशेची सुरम्य स्वप्ने
कुठे प्रत्युषा नव्या उजडती

कुठे चांदण्या लुकलूक करुनी
मिचमिच डोळे देती दिपवुनी
कुठे चंद्रमा जलदा आडुनी
प्रीत पेरतो गुज लपवुनी

आकाशाने झुकता खाली
क्षितिजापाशी मीलन होते
धरती आणिक नभांगणाची
प्रेम कहाणी पसरत जाते

दि.२२/०५/२०२५
सकाळी ०८.०९ वा.



## (२२)
## माझा चांदवा तू सदा

चांदण झऱ्याच्या
आज काठावर रमू
एक पूनव मनात
चल तिच्यातून गमू

मन चकोर होताच
भूक चांदण्याची कळे
वाट पाहणे पाहणे
त्यात नाहताना फळे

अशी शीतलता कोठे
कधी कशी सापडावी
भेट आगळी रे तुझी
माझ्याशीच ती घडावी

चांदण्याचा झुला प्रिया
माझ्यासाठी बांध ना रे
माझा चांदवा तू सदा
होशील का सांग ना रे

मग सोशीन कितीही
राती अंधाऱ्या उदास
पुन्हा लाभशील तूच
पुऱ्या चंद्राचा ही आस

दि.१०/०७/२०२५
रात्री १०.४२ वा.



## (२३)
## असो मोकळे श्वास आकाश तारे

नको चंद्रतारे  ते स्वप्नील धुमारे
मला दे सख्या तू माझे माझे किनारे

नको देऊ काही तू उपमा नव्याने
जपावे मला मी जशी आहे ना रे

नको दूषणे भूषणेही तुझी ती
मला नित्य प्रेमात तू पाह ना रे

नको देऊ वचने उद्याची कधीही
जगू दे मला आजचे धुंद वारे

नको बंद कोशी मला जखडू राजा
असो मोकळे श्वास आकाश तारे

येईन जेंव्हा तुझ्या सोबतीने
जपावे तू सन्मान स्त्रीत्वाचे सारे

दि.०७/०८/२०२५
रात्री ११.४३ वा.



## (२४)
## नवीन वाटे चंद्रमा

नवीन वाटे चंद्रमा
नवी नवीच पौर्णिमा
नव्या ऋतूत सांगते
तुला प्रिया ही उर्णिमा

नवीच रात वाटते
नवी सखी ही भेटते
नवीन ज्वाल मन्मनी
नवीन स्पर्षे पेटते

नवीच जादू फेकते
शीत किरण सुंदरी
नव्या जगात डोलते
नवी दिशा का अंबरी

नवीन पाझरे पहा
अमृताचे चांदणे
दैवी लेणे प्रीतीचे
चांदणीचे सांगणे

नव्याच राज्यडंबरी
स्वप्न देखणे फुले
एक चंद्रमा मनी
रोज प्रियवरा डुले

दि.१२/०८ /२०२५
रात्री १०.४० वा.



## (२५)
## चंद्र खिडकीशी आला

चंद्र खिडकीशी आला
मला कानाशी बोलला
म्हणे भाग्य आले फळा
तुला... रूपचांदवा मिळाला

तेज शीतल तियेचे
अमृताची धार मुखी
सखी ज्याला मिळे ऐसी
तो रे त्रिखंडात सुखी

तिच्या प्रभेतच जादू
कांती ओसंडून जाई
खेचला जातो ना मीही
रोहिणीच्या प्रेमापाई

देई दिलासा मनाला
अशी प्रिया मिळावी की
प्रीत ईश्वराची भेट
दिव्यता ही कळावी की

म्हणूनच येतो मीही
तिचा गोडवा पाहण्या
थोडावेळ वेड्या तिच्या
सहवासात राहण्या
मुग्ध निकट राहण्या

दि.२३/०९/२०२५
रात्री ११.५७ वा.

## (२६)
## चतुर्दशीला पूनव

कोजागिरीच्या आदली
रात्र उगाच दमली
तिची वाट चांदण्याची
हिरमुसंत गमली

म्हणे मनात बापुडी
कधी पूर्ण मिळे बिंब
चंद्र पौर्णिमेचा आज
व्हावा माझ्यातच चिंब

दुःख कळेल कुणाला
एक पाऊल मी मागे
काय कमी सांगा एक
कला दुस्वासाने वागे

उगवावी तेजासवे
चतुर्दशीला पूनव
मग परिसीमा नाही
आनंदाला ना उणव

बदलतील का तिथी
साऱ्या पूर्णतेस जाव्या
प्रत्येकीच्या नशिबाला
चांदण्याच्या राती याव्या

दि.०५/१०/२०२५
रात्री ११.३६ वा.



**(२७)**

## चांद उतू किती गेला

चांद उतू किती गेला
त्याचं सांडलं चांदणं
लेऊ तनामनावर
कोजागिरीचं गोंदण

एका संवत्सरामध्ये
येई एकदा भरास
साऱ्या नभोमंडळात
चंद्रदेवाची आरास

अमृताचा सडा पडे
अनमोल गुणधर्म
जाणीयले वैद्यराजे
सोमदेवतेचे मर्म

दुग्धप्रसादात येई
पाझरून पीयूष हे
प्रासादाच्या सौधावर
चंद्र वाटे आयूष हे

नका दवडू उगाच
वाया रात लक्ष्मीची
जागरणे मिळते की
कृपा जन्मोजन्मीची

दि.०६/१०/२०२५
रात्री ११.५१ वा.



# (२८)
## कंदील हाती शोधत होते

आठवणींनी शिवता मनाला
धडधड वाढून गेली
घरात सखया काल तुझ्या
नावाची चर्चा झाली

किती वेळ मग घर माझे रे
दरवळून गेलेले
प्रीतफुलांच्या गंधासाठी
मन वळून गेलेले

सजले होते स्वप्नी मग मी
नव्या नवरी सारखी
कंदील हाती शोधत होते
तुला प्रिया सारखी

विवाहमंडप दिसला सजला
माळा फुलांच्या डोलत
मेंदीमधल्या रेषा रेखा
साथ देण्यास बोलत

नथनी बिंदी कंगण कुंडल
काजळ खुलले होते
मीच प्रियवरा रूपावर मग
माझ्या भुलले होते

कधी एकदा दिसशील तू मज
म्हणून तळमळ चाले
उभा शयनमंदिरी चंदेरी
चांद नभातून चाले

तू दिसला मज वाट पाहता
माझ्या येण्यासाठी
स्वप्न पूर्ण मग झाले राजा
ओढ भेटण्यासाठी

दि.३०/०१/२०२३
सकाळी ०९.२३ वा.



## (२९)
## त्याच्यासाठी हृदयपाकळी

कधीतरी असे का घडते
चालते पाऊल का अडते
कुणासाठी थबकून थांबे
मनी चांदणे दिनी पडते

कुणासाठी मन का झुरते
कुणीतरी मनी का उरते
मोरपीस अलगदसे गाली
अवचित हलकेसे फिरते

कुणी राहते सदा उरी
विसरते न विसरता परी
सामावून जाते ते असे
वजा न होते कधीच परी

सूर एक छेडतो कुणी
प्रीतहृदयी झंकार झणी
शिरशिर शिरवा विचार त्याचा
तोच राहतो खोल मनी

निशिदिनी असतो अवतीभवती
घेऊन येतो नवीच नवती
त्याच्यासाठी हृदयपाकळी
त्याच्या प्रेमावर लवती

दि.०६/०३/२०२४
रात्री १०.१० वा.



## (३०)
## शापित शशीचे चक्र उदास

चंद्र म्हणाला नकोच आता
विरही नभातून एकटे राती
जरा कळ्या मी होऊन जावे
गंध घेऊनी फुलेही साथी

उगाच वेड्या चांदण्यातली
दिशाहीन का भासे भ्रमंती
उद्यानातील फुलाफुलांची
परिमळलेली गोड संगती

लुकलूक करतील लक्ष चांदण्या
तरीही दूर त्या गावी राहतील
कळ्या फुलांच्या कोषांमध्ये
दडवून सुरभी दिव्या पाहतील

इथे अमावस अर्ध मास मी
झुरतो उरतो काहीच ना
तिथे फुलांचे उत्सव फुलण्या
मुहूर्त कसले नाहीच ना

ऋतू कसे मी इथून पाहणे
तिथे ओथंबुन भिजणारे
इथे प्रियेच्या आठवणीने
डोळे माझे थिजणारे

म्हणून वाटते नको आताशी
शापित शशीचे चक्र उदास
रोज नव्याने उमलून यावे
कळ्या फुलांचे मोहक हास

दि.०२/०६/२०२४
सकाळी ०८.०४ वा.



## (३१)
## तुझं माझं आभाळ

तुझं माझं आभाळ
नभ गाभूळलं
चांदण्या ताऱ्यांनी ते
हाती ओघळलं

अगणित ताऱ्यांच्या
पुंजक्यात काय
निखळल्या ताऱ्याचे
गुपित ते काय

एकदाच दोघांनी
काही मागायचं
प्रीतीतल्या गावात
खुळं वागायचं

हात मोकळाले नि
दिशा मस्तवाल
कवेत आसमंत सारा
तेज उस्तवाल

सांग अशा क्षणांना
तू मी तारे होतो
एकमेका मनातून
आशा वारे होतो

चल चल पुन्हा आता
दोघे एक होऊ
आपुल्याच नभांगणी
तारे होत राहु

दि.११/०६/२०२४
सकाळी ०८.४४ वा.




## (३२)
## स्वप्नांची फुलपाखरे येती

कुठली पुण्ये कशी फळावी
ओंजळीत सुख येताना
नकळत घडते काही ऐसे
कवेत चांदणे घेताना

आकाशातील चंद्र तारका
लुकलूकताना हसतात
फुले सानुली आपसूक हळवी
गंधकोशी मग बसतात

स्वप्नांची फुलपाखरे येती
भावमधुलिका भरण्याला
पहाटवेळी गुंजन खेळी
मनी मोहना स्मरण्याला

आकाशाचे रंग हजारो
पसरून जाती अवकाशी
आणि निशेला जाग रोजची
नक्षत्रांच्या बाहुशी

श्वास मोकळे भरता येतील
दिशा खुल्या दश स्फुरताना
कधी कुणाच्या आठवातुनी
जन्मोजन्मी उरताना

दि.२५/०६/२०२४
सकाळी ०७.५८ वा.



## (३३)
## सुखाचा किनारा

तुझा हात हाती
चांदण्यात राती
वाट ही नशीली
जळी चांद वाती

इथे पेटलेल्या
विरहास शमवी
तुझे रूप चंद्रम्याच्या
तेजास नमवी

हरित भान स्वप्नील
मनी हुळहुळे जे
स्पर्शातुनी नवखे
प्रेम का खुले हे

प्रिये सांग कोणास
लाभे हा सहारा
जवळी असता तू गे
सुखाचा किनारा

नको शब्द केवळ
भाव हे पुरावे
चांदव्यानेही नको ग
अंबरी झुरावे

मिळो ज्याचे त्याला
मनाचे निवारे
फिरो मानसी वर
सुगंधी फवारे

दि.२७/०६/२०२४
रात्री ०७.३५ वा.



## (३४)
## गुलाब उपवन गुलाबी मळे

गुलाब उपवन गुलाबी मळे
गुलाब फुलले हासत सगळे
चंद्र गुलाबी चांदणेही ते
गुलाबीच भवतालचे खळे

गुलाब रांगांमध्ये गुलाबी
हवा गुलाबी वाहत राही
गुलाबदल ते उमलून येता
गुलाब खुलले गुलशन काही

गंध गुलाबी अत्तरदानी
स्पर्श गुलाबी मंतरलेले
गुलाब येथे गुलाब तेथे
भाग्य गुलाबी अंथरलेले

काट्यांवरती डुलती गुलाब
दुःख सोस बोलती गुलाब
सुख जे हवे ते मिळे कधी
मातीत रुतून घे वदे गुलाब

मनास येई रंग गुलाबी
क्षणाक्षणाला संग गुलाबी
राधा मोहन छंद गुलाबी
प्रेम बहर स्वच्छंद गुलाबी

दि.०७/०७/२०२४
रात्री ०७.१९ वा.



## (३५)
## भाग्यवती मज हातीची

ऐक राणी ऐक माझे
प्रीतभरले सांगणे
तू सदा माझीच म्हणता
गाली हसले चांदणे

सारुनी विरहास दूरी
मीलनाच्या वाटुल्या
काळजाच्या वाटेवरती
गोड मधुरा भेटुल्या

सांधताना रेशमाचे
मल्मली धागे जरा
मोहवी मज भाळवीतो
मोहिनी तव चेहरा

भास नि आभास सारे
आसमंती दंगले
तेवढ्यातच स्वप्न आपुले
सप्तरंगी रंगले

मागतो मी रोज त्याला
साथ राहो साथीची
ही सखी ही प्रीत वेडी
भाग्यवती मज हातीची

दि.०५/११/२०२४
सकाळी ०४.३५ वा.



## (३६)
## हात तुझा रे धरून जाईल

झुरून जाईल तुझी सखी रे
संपली तरी उरून जाईल
तूच जर कधी अव्हेरले तर
मरणालागी स्मरून जाईल

क्षण प्रेमाचे तुझे आठवून
जन्मोजन्मी तरून जाईल
जीव सोडला तरीही संचित
तुझ्याच नावे करून जाईल

कधी सुन्या अंधाऱ्या राती
प्रीतचांदणे झरून जाईल
आले संकट झेलून घेता
चक्रची सारे फिरून जाईल

रिक्त होत जरी गेले कधी तरी
तुझी मी झोळी भरून जाईल
वाहत वाहत कालौघातून
हाक दिलीस तर ठरून जाईल

असे तुझे रे जग स्वप्नीले
क्षणाक्षणाला करून जाईल
सावलीरूपे येत साथीशी
हात तुझा रे धरून जाईल

दि.१०/०१/२०२५
सकाळी ०८.१० वा.



## (३७)
## हे असंच होतं नेहमी

हे असंच होतं नेहमी
हरखून पाहणं
तुझ्या रूप चांदव्यात
मनसोक्त नाहणं

हे असंच होतं नेहमी
डोळ्यामध्ये राहणं
तुझ्या भावनदीमध्ये
लाट होऊन वाहणं

हे असंच होतं नेहमी
पैंजणात गाणं
रुणुझुणु नादामध्ये
भारावून जाणं

हे असंच होतं नेहमी
काकणांची किणकिण
जीव माझा झुरताना
फडफडे मिणमिण

हे असंच होतं नेहमी
दुर्लक्ष तुझं
तू सहजीच विसरणं
अन ...उध्वस्त गाव माझं
हे असंच होतं नेहमी

दि.१७/०७/२०२५
सकाळी ०८.५३ वा.



## (३८)
## पहा दिव्यांचे रिंगण

पहा दिव्यांचे रिंगण
उजळलेले अंगण
जळण्याचे वसे इथे
रोज द्यायचे आंदण

कधी रात चांदण्याची
कधी अवस अंधारी
कधी दुःख रेंगाळते
कधी सुख येते दारी

जरी सोबत पेटले
कसे सांगायचे कुणी
कोण किती जळणार
वाट(त) कुणाची हो उणी

नको विचार कशाचा
दाह मनाला फुकाचा
उजळणे व्हावे नित
व्हावा प्रकाश देहाचा

संपणारे संपायचे
किती कुठे गुंतायचे
वाट चालावी आपण
कुणी वृथा जुंपायचे

दि.२०/११/२०२५
सकाळी ०७.२२ वा.



## (३९)
## मोहरीच्या
## पिवळ्या पिवळ्या फुलात

मोहरीच्या पिवळ्या पिवळ्या
फुलात मोहरून गेली
आज  माझी मनुली हळवी
लाजून गाली आली

धुक्यात दवबिंदूंच्या माळा
अंगावर दवबिंदू जाळी
डवरून आली गोरी गोमटी
कांचनरंगी मोहरी पिवळी

डुलत राहते हलकी हलकी
सख्या वाऱ्याच्या अंगावरती
मधेच हसते मळ्यात बसते
घेऊन प्रीतीमधली गिरकी

काय बोलते हळूच सखीच्या
कानामध्ये गीतही पिवळे
साडी पिवळी नक्षी पिवळी
पिवळी जर अन काठही पिवळे

उन्हात थोडी गरमाईची
शाल उबेची मग पांघरते
अजून पिवळी होते धम्मक
गम्मत घडुनी ती गांगरते

दि.२४/०१/२०२४
सकाळी ०९.१० वा.

## (४०)
## सारी मजा असावी...

विरहात जागण्याची वेडी सजा नसावी
प्रीतीत भेटण्याची सारी मजा असावी।।

वाटे रती मिळाली मदना वसंत येता
कामातुनी हव्या त्या वेळी रजा असावी।।

जोडून आणता मी गंधाळल्या क्षणांना
तेंव्हा प्रिये तुझीही गोडी वजा नसावी।।

विसरून देत सारे तीही जरा बसावी
रागात बोलण्याची जागा उगा असावी।।

माळीण मोगरीच्या केसात त्या फुलांना
रागात पाहताना तीही फुगा नसावी ।।

मिटवीन भांडणाते घेता मिठीत राती
तेंव्हा प्रिया जराशी लाजाळुजा असावी।।

दि.१५/०२/२०२४
सकाळी ०६.३८ वा.

## (४१)
## कोठून जाग आली

झोपेत गाढ माझ्या,
कोठून जाग आली
आवाज मोहणारे,
लाजून साद घाली ।।

स्वप्नात रंगलेली,
सृष्टीही दंगलेली
रंभा खरीखुरीशी,
उतरून आज खाली ।।

गालावरी खुणांना,
पुसण्यास जात होतो
वाढून रंग गेला,
पसरून लाज आली ।।

तारुण्य मोहवीते,
तोडून बंधनांना
तारे फितूर होता,
लाजून साज घाली ।।

सारे खरेच वाटे,
घडते पुढ्यात माझ्या
कोणावरी उगाचा,
सोडून राग आली ।।

दि.१३/०२/२०२४
रात्री ०२.१९ वा.



## (४२)
## म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग

सुरंगीच्या गजऱ्यात मन माझे गुंते
तुझ्या भेटीसाठी अजूनही ते खुंते
भेटून दोघे जे बोलत असू ना
सुगंधित क्षण ते मुखी एक हसू ना

हळुवार मी माळताना सुरंगी
तुझ्या केशसंभारी का लाजते ग
उगा का अशी कंपिता होऊनी तू
नजरेस झुकवून अजब वागते ग

जितकी तू जाशील प्रिये दूर दूर
जणू मजसी जवळी तू येण्या खुणावे
असे वाटते पाहुनी मुग्ध चाळे
तुझ्या मीलनी ओढ माझी दुनावे

कसला तो मादक असे गंध वेडा
तोही भुलावा तू इतकी ग लोभस
असे वाटते निरखुनी तुजसी घ्यावे
तुझ्याने हे जीवन करिशी ग शोभस

तुझ्या माझ्या हृदयी सुरंगीचे काळीज
मळे सुरभीचे ते अजुनी वाहतात
क्षण मोहणारे तिथेची अजूनी
तुझ्या कुंतली ताजेसे राहतात

म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग
तिच्याने मनी प्रीत मज दाटते ग
पुन्हा तोच येईल ऋतुराज हासत
सीमा सुखाची चरम गाठते ग

दि.२९/०३/२०२४
सकाळी ०७.४७ वा.



(४३)

**चुडा जपला मनी मी**

सखे साथी चुडा माझा
लग्नापासून जाहला
हिरव्या रंगाचं गुपित
अंगी लेऊन राहिला

किणकिण मधुराची
संगे सखे ती असते
स्वप्नफुलांना हळव्या
घेऊनिया की हसते

नववधूच्या भावना
कानी प्रीतीच्या सांग ना
राजसाच्या खेळविती
अंगा अंगावर खुणा

मेंदीभरल्या क्षणांना
चुडा सजवीत जातो
एक नाद वेडावला
कसा जडवीत जातो

सप्तपदी चालताना
हात हातात घेताना
चुडा पाहतो साक्षीने
सजनाची मी होताना

लाजाहोम लाजलेला
चुडा गाली हसलेला
भेट पहिली वहिली
प्रतीक्षेत बसलेला

चुडा जपला मनी मी
कपाटातल्या खणी मी
जीवनाची सुरुवात
तीच नवी मी जुनी मी

चुडा आजही सांगतो
स्पर्श रेशमी सुखाचे
रुळताना मनगटी
झंकारणे स्पंदनाचे

दि.०६/०४/२०२४
रात्री ०९.५३ वा.



## (४४)
## पाऊस म्हणजे काय

भिजून हासल्या कळ्या फुलांना
पाऊस म्हणजे काय
हळूच पुसावे जरा विसावे
समजून घ्यावे उपाय

दलादळातून उत्साहाचे
फुटतील नवे खुमार
दवबिंदूंच्या अवखळ खोड्या
नवेच त्यांचे धुमार

धारा थोड्या तारसुरांनी
तालातून वाहतील
तशाच लज्जा गालावरची
भ्रमर कुसुम पाहतील

नव संदेशा नव्या त्या दिशा
अलगद स्वीकारून
डोलून जाईल फांदी हळवी
भावतुरे लेऊन

कधीतरी मग विश्रांती तो
पाऊस घेताना
स्मृती ओलसर आणिक गंधित
मातीस देताना

आठवून आषाढ नि श्रावण
संवत्सर जावा
पाऊस माझ्या काळजात हा
खोलवरी रहावा

दि.१२/०७/२०२४
सकाळी ०९.०१ वा.



## (४५)
## भीज पावसाची

भीज पावसाची शीतल शहाऱ्याची
धुंद राहण्याची ही संगती अशी
गाभुळला ऋतू जाई उतू उतू
भावनांची हुतुतू संमती कशी

धुरव्यात धुकं काळजाचं ठोकं
बधिरलं अंग अंग दंग होत बसं
नजरेत लाज तिचा दाटलाय साज
कोपऱ्यात डोळ्याच्या अलवार हसं

छत्रीत एका, बिलगून एकमेका
तुझ्या माझ्या भावनांचा,
उंच उंच झोका
जरा जरा थांब, जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा, मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे, काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा, थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया, उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत, आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (४६)
## पाऊस वेडा वागे

मीऽऽ तूऽऽ पाऊस छत्री
आठवले ना काही
कधीकाळचा पाऊस वेडा
अजून मनात राही

सरी ओघळल्या लाजलाजुनी
अंगावरती शहारा
तशात छेडीत खोडी काढतो
मस्त धुंदला वारा

पानोपानी राग पसरला
मल्हाराचा मधुरसा
धुक्यात हरवून जाते सकाळ ही
रस्ता रोजचा दूरसा

ओल्या ओल्या मातीमधल्या
अत्तरदाण्या खुलल्या
कुठे लाजवंतीच्या गाली
मीलन कलिका फुलल्या

येतो पाऊस गवाक्ष साक्षी
ओघळते ना वर्षा
आसुसलेले जीव भेटता
किती उत्सुकता स्पर्शा

मनात माझ्या अजूनही तो
पाऊस वेडा वागे
आठवणींनी पुन्हा नव्याने
प्रीत मनातून जागे

दि.०३/०८/२०२४
दुपारी १२.३१ वा.



## (४७)
## एक गुलाब जो

गुलाब भिजला दवबिंदूंनी
थरारल्या पाकळ्या
रंग खुलावा इतुका सुंदर
नाजुकशा ग कळ्या

वर्षाराणी भिजवीत जाते
चिंब रानावना
बहर खेळवी ऋतू गंधाचे
भुरळ वेडी मना

जरी काट्यांवर जगणे आहे
पहा गुलाबाचे
हासत रहाणे उमलत जाणे
धुंद गुलाबाचे

हिरव्या कऱ्या पानांवरती
हिरवाई मांडली
अत्तर कुपी ही दरवळलेली
कुणी कधी सांडली

एक गुलाब जो तुझ्या नि माझ्या
काळजात राहिला
किंचित लाजून खळाळलेला
तेंव्हा मी तो पाहिला

तू मी, मी तू, गुलाब संगे
मंद्र चांदणे होते
तुझे नि माझे हृदय जोडले
उधाणलेले होते

दि.१०/०८/२०२४
संध्याकाळी ०५.३४ वा.



## (४८)
## वर्षाराणीचे चित्र मोहक

पाऊस भरल्या आभाळाला
सपान रंगीत पडलं
भुईवर लाजून फुलाफुलांचं
गोड गुपित हे घडलं

उमलून आल्या कळ्या कोवळ्या
रंग अंगात भरले
लाल, गुलाबी, शुभ्र नि पिवळे
पोपटी गाणे उरले

एक एकटा वृक्ष पठारी
साक्षी होत डवरला
पानोपानी त्याच्याही मग
उत्साह किती हो भरला

अंथरलेली दुशाल मऊ ती
कुसुम पायघडी होते
स्पर्श मुलायम नेत्रसुखाची
अजोड मनघडी होते

आभाळाचे बरस बरसणे
कलिका लतांचे झुलणे
सुरभीनेही मंदमंदसे
आसमंतास भुलणे

नयनांमध्ये जरा भरावे
थेंब दवाचे लोभस
चित्र असे का कुणी काढले
वर्षाराणीचे मोहक

दि.०४/०९/२०२४
सकाळी ०९.५४ वा.



(४९)

## पापणी कोरली येथे

ही पुष्पराणी नाव पापणी
कोरीव डोळ्यावर
जणू लवलेली मदनपापणी
मोहित नयनावर


निळे जांभळे डोळे पाणीदार
विशाल लोचनदल
उघडझाप चालते निरंतर
रमणीची चंचल

काय पाहते कुणास ठाऊक
रानोमाळी राणी
तिच्या भोवती फूलपाखरे
गाती सुंदर गाणी

त्या नेत्रांवर अलगद कोणी
चुंबन का दिधले ते
लाजून लाजून गेली मिटुनी
डोळे गूज वदले ते

आता कोणी येईल रसिक नि
बुडून जाईल तेथे
अशी साजरी किती लाजरी
पापणी कोरली येथे

दि.२३/११/२०२४
रात्री ११.४३ वा.



## (५०)
## प्रिया वधू मी सख्या तुझी रे

प्रिया वधू मी सख्या तुझी  रे
नटले सजले आहे
दर्पणी पाहते रूप निखरले
लज्जेत मी भिजले आहे

तुला पाहते गाली हसते
मनात लाडिक आस
आता तुझ्या नावाने येतील
जातील माझे श्वास

शालू खुलला मेंदी रंगली
गजरा फुलला आहे
साजन माझा प्रीत बावरा
मजवर भुलला आहे

नजरेमध्ये किती स्वप्नांची
माळ ओवली आहे
वाट प्रिया तू दे ना फुलांची
सजनी कोवळी आहे

तुझ्यासवे मी सुख भरलेले
चित्र पाहते आहे
गुंग सदा मी दंग प्रिया रे
तव रंगी राहते आहे

दि.१५/१२/२०२४
रात्री ११.२३ वा.



**(५१)**

## तुझे हळवेसे माझे होणे

कातर कातर अधरांवरती
साजन स्पर्शाची शेवंती
थरथर नवथर मीलन राती
बुजरी सखी का ती लाजवंती

नव्या नवेल्या अधीर वेळा
वाट पाहणे जीवास चाळा
नजर भेटली तरीही वाटे
साजन जवळी जवळी आला

श्वासांवरती गंध पेरणे
मंद चांदणे भुई ओघळणे
नभात पाहून निशाकराला
उगाच वसुधेने पाघळणे

वाऱ्यावती जरी आली की
हाक कुणा दुसऱ्यास मारली
आवाजाच्या हव्या स्वराने
प्रिया तुझी बघ काळीज हरली

तुझे चालणे तुझे बोलणे
सहवासाने जीवन कळणे
हळूच कानी वदला सखया
तुझे हळवेसे माझे होणे

दि.११/०१/२०२५
सकाळी ०९.४२ वा.



## (५२)
## प्रियवरा वळून पाहतो का

हे कुठले जडले नाते
कुठल्या ह्या रेशीमगाठी
कोठून वाटते कोणी
जन्मले आपुल्या साठी

सौंदर्य ओतप्रोतून
ईश्वरी स्पर्श ओतून
स्थळ काही उरती इथले
लावून ओढ आतून

बघ समोर पर्वत रांगा
लाजून धुक्यातून दडल्या
येथेच सरोवर काठी
जवळीकता आपुल्या घडल्या

हलकेच चालते नौका
कधी उगाच चुकतो ठोका
मी अजून तेथे आहे
प्रियवरा वळून पाहतो का

क्षण सुंदर सुंदर इथले
लोचनात अलगद टिपले
चल पुन्हा पुन्हा जाऊनिया
पाहू जे चित्र मज दिसले

दि.२७/०१/२०२५
रात्री ११.३८ वा.



## (५३)
## शोनुली गोडुली बाहुली

शोनुली गोडुली बाहुली
माझी लाडाची छकुली
नाजुक सुंदर कवळी
सानुली माझी बकुळी

एक खरी सखी राणूली
हासते गालात खळखळू
भावना नाजूक फुलांच्या मनात
जणू ही वागते अळुमाळू

वेलीवरले फुल कोमल
सुगंध तिचा लागे दरवळू
चैतन्याची खणी माझी ही मनी
आहे किती हो मायाळू

जरा वागते लाज लाजाळू
हिरमुसते ना कैसे तिज कळू
आहे सुकुमार अशी अलवार
पुष्पा सुकुमार माझी कळू

हुंदडते बागडते पळते
वात्सल्य खेळाचे खेळ खेळू
पदरी आली सोनपरी माझ्या
क्षण सोन्याचे भाग्याने मेळू

दि.०३/०३/२०२५
सकाळी ०७.३२ वा.



## (५४)
## प्रिये अनुप्रिये

काय झाले ग प्रिये अनुप्रिये
किती तू लाजलीस गोड
आहे का सांग पाहू तुझ्या या लज्जेला
कश्याची तरी तोड

अशीच तुझी मोहिविते
मजसी नेहमीच खोड
कधीतरी फक्त चोचीवरला
इवलुसा तू राग राणी सोड

आजही बघता तुला
काहीच सुचत नाही बघ
काळजाला वेगळीच
मधुरशी लागते रग

मी गुंग तुझ्यात दंग
तुझेच रंग मनावर
तू माझी मैना तुझा मी राजा
भाव माझे अनावर

ये ग ये राणी माझी
मोतीयाच्या दाण्याने मढवीन तुझी चोच
एक पंख माझ्या प्रीतीचा
हळुवार तुझ्या पंखात खोच

दि.२१/०३/२०२५
सकाळी ०७.५३ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २0२0 प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६0 पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २000 पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा, सुख सुखाचं, पानापानातली कथा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, निरव नमन (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता, शब्द तुझ्या नावाचे (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी, मृणालिनी, उडण्या हे आभाळ (स्त्रीजीवन), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या, शब्द पाखरं, वेध मनाचा, मन मोहरून माझे (मन), सुखाचा किनारा (सुख-दुःख), आनंद गंधपाणी, दूर त्या तिथे (गंध-सुगंध), थांब जरा तू (नाती-गोती), स्पंदनरेषा (पशु-पक्षी - घरटे), घडते नवेच काही (चंद्र आणि लज्जा) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके

देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त

- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री – डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १२७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ०३
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •